# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग)

### -: सभेचे इतिवृत्त :-

मा. प्रशासक तथा अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण समिती, मनपा नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दिनांक 03.02.2025 रोजी वेळ स. 11.30 वाजता नविन प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात संपन्न झालेल्या वृक्ष प्राधिकरण सभेचे इतिवृत्त.

या सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित आहेत.

1) श्रीमती. आंचल गोयल, अति. आयुक्त (शहर)
2) श्री. गणेश राठोड, उपायुक्त (उद्यान) तथा वृक्ष अधिकारी.
3) श्री. अमोल चौरपगार, वृक्ष संवर्धक

या सभेत खालील प्रमाणे नमूद विषयावर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

**विषय**

अधिष्ठाता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर यांनी परिसरातील प्रस्तावित विविध नविन इमारतीच्या, बहुस्तरीय पार्किंग व क्रीडा संकुलच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या विविध प्रजातीच्या 39 नग झाडास जमिनीपासून कापणी व 2 नग वृक्षास प्रत्यारोपण करण्याची परवानगी मिळण्याकरीता विनंती केली होती.

या प्रकरणी पाहणी करण्यात आली असता, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवर नर्सिंग महाविद्यालय, नर्सिंग मुलींचे वस्तीगृह, बहुस्तरीय वाहन पार्किंग, क्रीडा संकुल, नोंदणी कार्यालय, Auditorium Building इत्यादी नवीन इमारतीचे बांधकाम प्रस्तावित असून या परिसरात असलेली पुरातन बकुळ-1 व वड-1 अशी 2 नग वृक्षाच्या फांद्या तसेच **पुरातन (हेरिटेज)** अशोका-3, उंबर-1 (प्रत्यारोपन), कडूनिम-1, कदंब-1, गुलमोहर-2, चिंच-1, जांभूळ-1, पेल्ट्राफार्म-1, बकुळ-1, (प्रत्यारोपन), महारुख-1, रेनट्री-1 अशी एकूण 14 व **नॉन हेरीटेज** आंबा-3, कडूनिम-2, करंजी-2, किन्ही-1, केशिया-1, गुलमोहर-2, गोडनिंब-2, चिचबिलाई-1, पेरू-1, बकुळ-1, बाभूळ-1, महारुख-1, शेवगा-1, सप्तपर्णी-1, सिताफळ-1, सुबाभूळ-6 अशी एकूण (14+27= 41) 41 नग वृक्ष या प्रस्तावित विविध इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करीत आहेत.

या प्रकरणी महाराष्ट्र टाईम्स वर्तमान पत्रात जाहिरात क्र. 845/PR अन्वये दिनांक 10.01.2025 ला जाहिरात प्रसिद्ध करून नागरिकांचे आक्षेप मागविण्यात आले असता प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीवर 24 नागरिकांचे आक्षेप प्राप्त झाले. त्यानुषंगाने दिनांक 21.01.2025 रोजी आक्षेपकर्त्यांची सुनावणी घेण्यात आली असून सुनावणीचे आदेश नस्तीस सलग्न आहे.

इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथील जागेवरील प्रस्तावित नविन विविध इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या **पुरातन (हेरीटेज)** 14 व **नॉन हेरीटेज** 27 अश्या एकूण 41 नग झाडाच्या मोबदल्यात **महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग पाच, जुलै 5, 2021/आषाढ 14, शके 1943 अन्वये प्रकरण 6 मुख्य अधिनियमाच्या कलम 8 मधील पोट कलम (4) (ब) अन्वये कापणी करण्यात येणाऱ्या त्याच जातीचे किंवा इतर कोणत्याही मूळ जातीचे कापणी करण्यात येणाऱ्या झाडाच्या अंदाजीत वयाइतक्या झाडाच्या संख्येइतकी किमान 6 फुट इतक्या उंचीची 1628 नग नविन झाडांची लागवड करून सात वर्षे देखभाल करणे** या अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 16,28,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 1,63,800/- असे एकूण रु. 17,91,800/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** उंबर-1 व बकुळ-1 अशी 2 नग वृक्ष प्रत्यारोपण व **पुरातन (हेरीटेज)** 12 व **नॉन हेरीटेज** 27 अश्या एकूण (12+27=39) 39 नग वृक्षास जमिनीपासून कापणी करण्याची तसेच ऑडीटोरीयम इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन बकुळ-1 व वड-1 अशी 2 नग वृक्षाच्या फांद्याची छाटणी करण्याची मंजुरी प्रदान करण्याच्या विषयावर सभेत चर्चा करण्यात आली.

चर्चे दरम्यान अर्जदाराने कार्यालयास दिलेल्या दिनांक 03.02.2025 च्या पत्रान्वये ऑडीटोरीयमची प्रस्तावित इमारत 6 मीटर बाजूला घेण्यात असल्यामुळे वड-1 व बकुळ-1 अशी दोन वृक्ष वाचविण्यात आले आली आहे. बहुमजली वाहनतळ परिसरातील असलेली एक उंबर व एक बकुळ अश्या दोन वृक्षास खेळाच्या मैदान परिसरात प्रत्यारोपण करण्यात येणार आहे. तसेच संस्थेच्या अंतर्गत रस्त्याच्या व खेळाचे मैदान येथील परिसरातील विविध प्रजातीची एकूण 88 नग वृक्ष वाचवून बांधकामाचे नियोजन करण्यात आले आहे. संस्थेच्या प्रस्तावित नविन इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या व ज्या वृक्षांची कापणी करण्याकरीता पुरातन 12 व लहान नॉन हेरीटेज 27 तसेच प्रत्यारोपण करण्यात येणाऱ्या पुरातन बकुळ-1 व उंबर-1 अश्या एकूण 41 नग वृक्षाच्या मोबदल्यात पर्यायी नविन 6205 नग वृक्ष या संस्थेच्या परिसरात व अंतर्गत रस्तेच्या दोन्ही बाजूस व नियोजित उद्यानामध्ये लागवड करण्यात येतील. या संस्थेच्या

अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्र इंदोरा मध्ये एकूण 150 नग वृक्ष व जिल्हा शल्य चिकीत्सक, नागपूर यांच्या अधिनस्त असलेले मनोरुग्णालय, मानकापूर परिसरात एकूण 100 नग वृक्षाची लागवड करण्यात येईल, मनपा, नागपूर अंतर्गत असलेली शाळेच्या परिसरात एकूण 500 नग वृक्ष लावण्याचा मानस असून त्यापैकी 125 नग झाडे लावण्यात आलेली आहे. संस्था स्तरावर नागपूर शहरातील इतर उपलब्ध जागेवर वृक्ष लागवडी करीता शोध घेण्याकारीता समिती गठीत करण्यात आलेली आहे. अशा स्वरूपाचे पत्र प्राप्त आहे. एकंदरीत प्राप्त पत्रानुसार व इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर परिसरातील प्रस्तावित बांधकाम जनतेला सोयी-सुविधा पुरविणेबाबत असल्याने तसेच इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सोयी सुविधा उपलब्ध करून द्यावयाचे असल्यामुळे वरील अटीचे पालन होण्यास्तव अर्जदाराकडून डिपॉझिट रु. 16,28,000/- व प्रशासकीय शुल्क रु. 1,63,800/- असे एकूण रु. 17,91,800/- रक्कम स्विकारण्याच्या अटीवर सदर ठिकाणी असलेली **पुरातन (हेरीटेज)** उंबर-1 व बकुळ-1 अशी 2 नग वृक्ष प्रत्यारोपण व **पुरातन (हेरीटेज)** 12 व **नॉन हेरीटेज** 27 अश्या एकूण (12+27=39) 39 नग वृक्षास जमिनीपासून कापणी करण्याची तसेच ऑडीटोरीयम इमारतीच्या बांधकामात अडथळा निर्माण करणाऱ्या पुरातन बकुळ-1 व वड-1 अशी 2 नग वृक्षाच्या फांद्याची छाटणी करण्याची वृक्ष प्राधिकरण समितीने एकमताने अनुमती प्रदान केली.

| | |
|---|---|
| **उपायुक्त (उद्यान्)**<br>**तथा**<br>**वृक्ष अधिकारी**<br>**नागपूर महानगरपालिका, नागपूर** | **प्रशासक**<br>**तथा**<br>**अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**<br>**नागपूर महानगरपालिका, नागपूर** |